**नियमित दिवाणी दावा क्र.१५२/२०१२**

सागर कोळी वि.सागर आंबी

CNR NO.MHKO180003322012

**निशाणी ६८ खालील आदेश**

(दिनांक १७ डिसेंबर २०२१ रोजी पारीत )

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादीविरुध्द हक्कज्ञापनाचा व मनाई मनाईसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.३ दावा दाखल करताना अज्ञान होती. त्यामुळे प्रतिवादी क्र.३ च्या नावापुढे ''अज्ञान'' व अज्ञान पालनकर्ती आई प्रतिवादी क्र.२ तर्फे दावा दाखल करण्यात आला आहे. परंतु आता प्रतिवादी क्र.३ सज्ञान झाल्या असुन तिचे लग्न झाले आहे. अशापरिस्थीतीत प्रतिवादी क्र.२ च्या नावापुढे ''अज्ञान'' या शब्दास काट देऊन त्याठिकाणी ''सज्ञान'' असे नमुद करण्यात तसेच ''अ.पा.क. आई प्रतिवादी क्र.२ यास काट देवुन त्याठिकाणी ''रा.अकिवाट, ता.शिरोळ,जि.कोल्हापूर'' असे नमुद करण्यात यावे अशी विनंती वादीने केली आहे.

०२. प्रतिवादीतर्फे सदर अर्जाला हरकत घेण्यात आली आहे. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे अर्जातील नमुद मजकुर त्यांना मान्य नाही. दुरुस्ती अर्ज दाखल करण्यास विलंब झाला आहे व त्या विलंबाबाबत कोणतेही कारण नमुद केले नाही. त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आली आहे.

०३. वादीतर्फे व प्रतिवादीतर्फे त्यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

०४. वादी मागत असलेली दाद ही फॉर्मल स्वरुपाची असुन त्यामुळे दाव्याच्या रचनेत किंवा स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादीचेही कोणतेही नुकसान होणार नाही. किंबहुना अशाप्रकारची दुरुस्ती केल्यास दाव्यातील वादातीत

प्रश्न न्यायनिर्णीत करण्यासाठी मदत होईल.

०५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास त्याच्या वादकथनास, न्याय्य असेल अशा रितीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा करायला हव्यात. परंतु न्यायचौकशी सुरु झाल्यानंतर, पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेऊनसुध्दा न्यायचौकशी सुरु होण्यापुर्वी ती बाब पुढे आणता आली नाही. याबाबत न्यायालयाचे समाधान झाले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

०६. प्रस्तुत प्रकरणात अद्याप न्यायचौकशी सुरु झालेली नाही. वादी–प्रतिवादींचे कथन विचारात घेता दाव्यातील खरे प्रश्न निकालात काढण्याकरीता सदरची दुरुस्ती आवश्यक आहे असे दिसुन येते. त्यामुळे वादीचा अर्ज मंजुर करणे न्याय्य व योग्य होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे :–

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने अर्जात मागणी केल्याप्रमाणे आजपासून १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्ती करावी.

दिनांक – १७ डिसेंबर २०२१

(शलाका एस.जांभळे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कुरुंदवाड.